**कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना राबविण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१७/प्र.क्र.६३/फ-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २० सप्टेंबर, २०१७.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यास ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला असून सदर किनाऱ्याजवळ अंदाजे ३०,००० हेक्टर क्षेत्रावर कांदळवने अस्तित्वात आहेत. समुद्रापासून किनाऱ्यांचे संरक्षण तसेच सायक्लॉन व फायान सारख्या नैसर्गिक आपदांपासून कांदळवनांमुळे संरक्षण प्राप्त होते. कांदळवनांचा पर्यावरणीय महत्व विचारात घेता, त्यांना पुरेसे वैधानिक संरक्षण प्रदान करावे, या स्वरुपांचे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेळोवेळी दिलेले आहेत, त्यास अनुसरुन आतापर्यंत सुमारे १५,०८८ हेक्टर शासकीय जमिनीवरील व १,७७५ हेक्टर खाजगी क्षेत्रावरील कांदळवन अनुक्रमे "**राखीव वने**" व "**वने**" म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे. कांदळवनांमुळे किनारी प्रदेशांचे वादळांपासून संरक्षण होते, मासे व खेकडे यांना अल्प वयात संरक्षण मिळून उपयोगी उत्पादन वाढते, पर्यटनाची साधने उपलब्ध होतात व किनारी जैवविविधता टिकून राहण्यास मदत होते.

शासकीय कांदळवनांचे संरक्षण होणे व त्यावर अवलंबून असलेल्या लोकांची उपजिविका यांचा मेळ घालणे, तसेच खाजगी मालकीच्या कांदळवनापासून सुद्धा उपजिविकेची साधने उपलब्ध करुन देणे, कांदळवनाचा दर्जा उंचावणे यासाठी संयुक्त वन व्यवस्थापनाच्या धर्तीवर कांदळवनांचे वैशिष्ठये लक्षात घेऊन **"कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना"** राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे : -

**शासन निर्णय :-**

राज्याचे सागरी व खाडी क्षेत्रालगत असलेल्या गावांतील / नागरी समूहातील गावांमध्ये जर कांदळवन क्षेत्रावर अवलंबून असलेल्या व्यक्ती / मच्छिमारी समाज / अन्य समाज असतील तर अशा ठिकाणी **कांदळवन सह व्यवस्थापन समिती** गठीत करुन सदस्यांचे वैयक्तिक व सामूहिक उत्पन्न वाढवण्यासाठी आणि कांदळवनांचे प्रभावी संरक्षण त्यांचे माध्यमातून करण्यासाठी सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीत **"कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना"** प्रकल्प स्वरुपात (Project Mode) राबविण्यात येईल.

**१.०० योजनेची उदिष्टे :**

१. खाजगी, शासकीय व सामूहिक कांदळवन क्षेत्रास उत्पादनक्षम साधन बनवणे व कांदळवनांचा दर्जा उंचावणे.
२. शासकीय कांदळवनांचे नियोजनबद्ध संरक्षण व संवर्धनामध्ये त्यावर अवलंबून असलेल्या ग्रामस्थांचे योगदान घेणे व त्यांच्या उपजिविका साधनांचा विकास करणे.
३. वन विभाग व स्थानिक जनता यांच्यातील सहजीवन वाढवून परस्पर सहकार्य वृध्दींगत करणे.
४. त्यासाठी अवलंबितत्व असलेल्या व्यक्तींचे समूह तयार करुन अशा संस्थांशी करारनामे करणे, सदर क्षेत्राबाबत सूक्ष्म व्यवस्थापन आराखडा (Micro plan) तयार करणे, सदर समूहांना आवश्यक प्रशिक्षण देणे.

५. योजनेच्या माध्यमातून प्राप्त होणारे उत्पन्न वन संवर्धन व सदर समूहाच्या विकासासाठी वापरणे.

६. शासनाच्या विविध विभागांच्या योजनेतील तरतूदींची सांगड (Convergence) घालणे.

**२.०० <u>योजनेची अंमलबजावणी</u> :-**

**२.०१ <u>कार्यान्वयीन यंत्रणा</u>** - सदर योजना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांचे नियंत्रणाखाली राहील. योजनेचा वार्षिक आराखडा तयार करणे, आवश्यक निधीची मागणी करणे व वितरीत करणे, कामांचे मूल्यमापन करणे, योजनेत बदल आवश्यक असल्यास राज्य स्तरीय समितीच्या पूर्व मान्यतेने बदल करणे व त्याबाबत शासनास आवश्यक तो अहवाल सादर करणे, योजनेचे सर्वसाधारण नियंत्रण करणे इत्यादी बाबी त्यांच्या अधिनस्त राहतील.

ज्या गावचे / वस्तीचे क्षेत्रात कांदळवन आहे, तेथे सामूहिक स्वरुपाचे फायदे देण्यासाठी संस्थात्मक उभारणी करुन **"कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना"** राबवण्यात येईल. यासाठी **कांदळवन सह व्यवस्थापन समिती** स्थापन करण्यात येईल. सदर समितीची एक कार्यकारिणी अस्तित्वात राहील.

वैयक्तिक लाभार्थीसाठी ४० आर पेक्षा जास्त क्षेत्र असल्यास, संस्थेचे सदस्य असणे अथवा संस्थेमार्फत योजना राबविणे बंधनकारक राहणार नाही. अशी व्यक्ती संबंधित विभागीय वन अधिकारी / उप वनसंरक्षक यांचेमार्फत आवश्यक ती छाननी पूर्ण झाल्यावर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांचेकडे लाभार्थी म्हणून नोंदणीकृत होऊ शकेल व योजनेचे लाभ घेऊ शकेल.

**२.०२ <u>समूह निवडीचे निकष</u>** -

अ) **<u>खाजगी क्षेत्र लाभार्थी</u>** -

खाजगी क्षेत्रात लाभार्थी निवड करताना **४० आर पेक्षा जादा** कांदळवनक्षेत्र असलेल्या व्यक्तींना स्वतंत्र लाभार्थी म्हणून सहभागी होता येईल. त्यांचेसाठी खेकडापालन, मधुमक्षिका पालन इत्यादी सारखे पर्यावरण पूरक लघु व्यवसाय तसेच पर्यटन विकास, गृह पर्यटण इत्यादी सारखे कौशल्य विकास आणि क्षमता बांधणी यासाठी स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक मदत देण्यात येईल.

खाजगी क्षेत्रातील कांदळवन धारकांना ४० आर पेक्षा कमी क्षेत्र असल्यास सामूहिकरित्या कांदळवन सह-व्यवस्थापन समितीमार्फत (MCMC) खेकडा व कालवेपालन, मधुमक्षिकापालन व पर्यटन विकास या सारखे लाभ देण्यात येतील. पर्यटन विकासासाठी व मच्छिमारीसाठी होडया व जाळी खरेदीस मदत, पक्षीनिरिक्षण, खेकडे व मासे याची विक्रीव्यवस्था, मधुमक्षिकापालन, पिंजऱ्यातील मत्स्यपालन, शोभेचे मासे निर्मिती इ. बाबींसाठी क्षमता बांधणी उपक्रम राबवण्यात येतील. कांदळवनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी स्वयंपाक गॅसचा पुरवठा, सौर उपकरणे ही साधने सुध्दा वैयक्तिक लाभाच्या योजनेत देण्यात येतील.

खाजगी व्यक्तीं साठी वैयक्तिक लाभाच्या योजनेत शासन व व्यक्ती यांच्या **सहभागाचे प्रमाण (टक्केवारी) ७५:२५** तर सामूहिक स्वरुपाच्या कामांसाठी शासन व समिती यांच्या **सहभागाचे प्रमाण (टक्केवारी)** ९०:१० असे राहील.

<u>लाभार्थी निवडीचे निकष</u> -

१. अशा व्यक्तींचे वय किमान १८ वर्षे असावे व सदर व्यक्ती अशा कांदळवनक्षेत्राची कायदेशीर मालक असावी.

२. वैयक्तिकरित्या योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास किमान ४० आर कांदळवन क्षेत्र असणे आवश्यक आहे.

३. उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी वरील निकषांच्या आधारे व्यक्तींची निवड करुन त्यांची यादी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांना सादर करतील. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांच्या मान्यतेनंतर सदर यादी अंतिम होईल.

ब) **<u>सामूहिक क्षेत्रे / शासकीय वने</u>** -

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० तसेच इतर अनुषांगिक पर्यावरणीय कायद्याचा भंग न करता, सामूहिक / शासकीय कांदळवनावर अवलंबून असलेल्या व्यक्तीसाठी शास्वत मासेमारीस प्रोत्साहन, पर्यावरणपुरक उपजिवीकेचा विकास, निसर्ग-पर्यटन, कौशल्य विकास व इतर बाबींना संयुक्त वन व्यवस्थापनाची तत्वे सांभाळून, सामूहिक स्वरुपात चालना देण्याची शासनाची योजना आहे. यामध्ये कांदळवनक्षेत्रात पुर्नलागवड, कांदळवनांचे संरक्षण, संवेदनशील क्षेत्राभोवती संरक्षक भिंती बांधणे, कालवे पालन, खेकडे पालन, मधुक्षिकापालन, मासेमारीपुरक योजना राबवणे, पिंजऱ्यातून मत्स्यपालन, शोभिवंत मत्स्यशेती, खेकडा उबवणी केंद्रे विकसित करणे, स्कूबा डायव्हिंग, स्नॉरकलिंग (Snorkelling), पर्यटन मार्गदर्शक इत्यादी कौशल्य विकास आणि क्षमता बांधणी कामांना प्राधान्य देण्यात येईल.

**३.०० <u>कांदळवन सह व्यवस्थापन समितीचे गठण व नोंदणी</u> :-**

कांदळवनांचे संरक्षण करणे व त्यावर अवलंबून असलेल्या लोकांची उपजिविका यांचा मेळ घालणे, कांदळवनाचा दर्जा उंचावणे यासाठी सागरी व खाडी क्षेत्रालगत असलेल्या गावात **कांदळवन सह व्यवस्थापन समिती** गठीत करण्यात येईल. अशा समित्यांना **कांदळवन सह व्यवस्थापन समिती,** . . . . . (गाव / वाडी / वस्तीचे नाव) **(MCMC - Mangrove Co Management Committee, . . . . . .)** असे संबोधले जाईल. तथापि, अशा सर्व समितींवर सचिव म्हणून संबंधित कांदळवन क्षेत्राचे वनपाल / वनरक्षक यांची नियुक्ती करण्यात येईल. जर संबंधित क्षेत्रासाठी नियतक्षेत्र वनरक्षक उपलब्ध नसेल, तर त्या ठिकाणी सचिव म्हणून कांदळवन कक्ष / कांदळवन प्राधिकरणातील इतर कर्मचाऱ्याची नियुक्ती करता येईल.

समितींची नोंदणी सोसायटी रजिस्टेशन ॲक्ट, १८६० खाली संबंधित जिल्हयाच्या रजिस्ट्रार ऑफ सोसायटीजकडे करणे बंधनकारक राहील. शासन निर्णयाव्यतिरिक्तचे नियम / उप नियम, सदर संस्थेच्या सभासदांच्या सर्वसाधारण सभेमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार मंजूर करण्यात आलेले असावेत.

**३.०१ <u>कांदळवन सह व्यवस्थापन समितीचे कार्यक्षेत्र</u>** -

प्रत्येक पंचायतीसाठी एक कांदळवन सह व्यवस्थापन समितीचे गठन करण्यात येईल. मात्र समितीचे कार्यक्षेत्र संबधित पंचायतीमधील किनारी प्रभागापूर्ती (Coastal Wards) मर्यादित राहील.

**३.०२ <u>कांदळवन सह व्यवस्थापन समितीचे सदस्य निवडीचे निकष</u>** -

कांदळवन सह व्यवस्थापन समितीच्या **सर्व साधारण समिती** मध्ये खालील सदस्य निवडण्यात येतील :-

१. किनारी प्रभागात (Wards) मतदार असलेल्या व्यक्ती.

२. समितीच्या कार्यक्षेत्रात खाजगी मालकीचे कांदळवन असलेल्या व्यक्ती.

३. कार्यक्षेत्रातील मच्छिमार समाज / सोसायटीचे सदस्य असलेल्या व्यक्ती.

समितीच्या सर्व सदस्यांना समिती कार्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक राहील.

**कार्यकारी समिती** - कार्यकारी समितीत ७ सदस्यांचा समावेश असेल. समितीमध्ये ३ महिला व ३ पुरुष सदस्य असतील. त्यापैकी एक सदस्य अध्यक्ष असेल तर कांदळवन कक्षाचे वनपाल / वनरक्षक हे समितीचे सचिव असतील. समितीचे सदस्य हे शक्यतो कांदळवन क्षेत्रालगत राहणारे असावेत. समितीचे सदस्य एकाच कुटुंबातील नसावेत.

३.०३ कांदळवन सह व्यवस्थापन समितीची कर्तव्ये :-

१ गावातील कांदळवन क्षेत्रासाठी सूक्ष्म आराखडा तयार करणे.

२ कांदळवनांचे संरक्षण व संवर्धन करणे.

३ कांदळवन क्षेत्राचे सीमांकन करणे.

४ कांदळवनांसाठी आवश्यकता असल्यास कुंपण उभारणे.

५ कांदळवन रोपवने व नैसर्गिक पुर्नःनिर्मिती बाबत कामे करणे.

६ कांदळवनांवर उर्जेसाठी अवलंबून असलेल्या कुटुंबांना स्वंयपांकाचा गॅस (L.P.G) व सौर उत्पादने यांचा पुरवठा करणे.

**३.०४. सहव्यवस्थापन समितीतील सदस्यांना सामुहिकरित्या उपजिविका साधने उपलब्ध करुन घेण्यास पात्र असलेल्या व्यक्तीचे प्राधान्यक्रम -**

१. एक एकरपेक्षा कमी कांदळवन क्षेत्र धारण करणाऱ्या व्यक्ती.

२. एक एकरपेक्षा जादा कांदळवन क्षेत्र धारण करणाऱ्या अशा व्यक्ती की ज्या इतर योजनांच्या सदस्य नाहीत.

३. मच्छिमारी समाजातील महिला.

४. मच्छिमारी समाजातील पुरुष

५. स्वयंसहाय्यता गट.

६. इतर भूमिहीन व्यक्ती.

७. कांदळवन क्षेत्रातील सीमांकित (Marginal) शेतकरी.

**३.०५. सह-व्यवस्थापन समितीतील सदस्यांना उपजिविकेसाठी सूक्ष्म आराखडयाप्रमाणे खालील उपजिविका साधने उपलब्ध करुन देण्यात येतील.**

१. खेकडापालन

२. बहुआयामी मत्स्य शेती (मत्स्य व्यवसाय विभागाच्या सहभागांने Square Mesh Net व Turtle excluder devices मत्स्य व्यवसायांकाना पुरविणे)

३. कालवेपालन

४. मधुमक्षिकापालन

५. शिंपले पालन

६. गृहपर्यटन

७. शोभिवंत मत्स्य शेती

८. SRI भातशेती.

३.०६. <u>कांदळवन सह व्यवस्थापन समितीचे खाते :</u>

शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेसाठी राष्ट्रीयीकृत बँक किंवा पोस्ट ऑफीसमध्ये संयुक्त बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्यास **सरकारी खाते** असे संबोधण्यात येईल. सदर खात्याचे संचालन कार्यकारी समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव या दोघांद्वारे संयुक्तपणे करण्यात येईल. या खात्यांतर्गत होणाऱ्या निधीच्या विनियोगास संबंधित उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी यांचे स्तरावर मंजूरी घेतली जाईल.

समितीच्या स्वत:च्या उत्पन्नातून तसेच इतर स्त्रोतांकडून (वरील स्त्रोतांशिवाय) प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेसाठी राष्ट्रीयकृत बँक किंवा पोस्ट ऑफीसमध्ये स्वतंत्ररित्या बचत खाते उघडण्यात येईल. सदर बचत खात्यास **कांदळवन विकास समिती खाते** असे संबोधण्यात येईल. सदर खात्याचे संचालन अध्यक्ष व कोषाध्यक्ष किंवा कार्यकारणीतील एक सदस्य संयुक्तपणे करतील. सदरहू खात्यातील निधीच्या विनियोगास संस्थेच्या सर्वसाधारण बैठकीत मंजूरी घेतली जाईल.

३.०७. <u>वार्षिक लेखा परिक्षण</u> :

कांदळवन सह व्यवस्थापन समितीच्या सरकारी खात्याचे लेखापरिक्षण राज्य वन विकास यंत्रणा (SFDA) करिता शासनाने प्रचलित केलेल्या लेखापरिक्षण पध्दतीनुसार करण्यात येईल.

४.०० <u>समझौता - समयलेख</u>

कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना राबविण्यात येणाऱ्या व्यक्तींच्या समूहांनी / मच्छिमार संस्थांनी सर्वप्रथम सदर कार्यक्रम राबविण्यास तयार असल्याचा ठराव घेणे आवश्यक राहील. सदर ठरावामध्ये कांदळवन संवर्धन कार्यक्रमाअंतर्गत मिळणारे फायदे घेण्याकरिता कुऱ्हाड बंदी, चराई बंदी, कांदळवन संरक्षणाकामी वन विभागास मदत, डेब्रिस टाकण्यास मनाई, वनवणवा नियंत्रण व संरक्षण कामात सहकार्य करणे, गौण वनोपजांचा ऱ्हास थांबविणे, या बाबींचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक राहील. वैयक्तिक लाभाच्या योजनांचा फायदा घेणारे सर्व लाभधारकही कांदळवन संरक्षणाकामी सहभाग घेण्यास बांधील राहतील. याबाबत सोबत जोडलेल्या प्रारुपानुसार समझोता-समयलेख अध्यक्ष, कांदळवन सह व्यवस्थापन समिती / वैयक्तिक लाभार्थी व संबंधित विभागीय वन अधिकारी / उप वनसंरक्षक यांच्यामध्ये करण्यात येईल.

**४.०१ सदर योजनेत खाजगी व्यक्ती / समाविष्ट संस्थेतील व्यक्तींना खालील बाबींची परवानगी राहील** :-

कांदळवनांचे कोणत्याही तऱ्हेचे नुकसान होणार नाही तसेच वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व इतर अनुषांगीक पर्यावरण संबंधित कायद्यांतील तरतूदींचा भंग होणार नाही, अशा पध्दतीने अभ्यासपूर्वक सूक्ष्म आराखडा तयार करुन सदर समितींना कांदळवन क्षेत्रात खालील कामे करता येतील :-

१. मत्स्य पालन, कालवे पालन, खेकडे पालन.
२. वरील प्रकारचे मत्स्य पालन, कालवे पालन, खेकडे पालन व इतर उपजिविका साधने यांचे विकासासाठी आवश्यक ते प्रशिक्षण आयोजित करणे.
३. पर्यटनासाठी तात्पुरता निवारा निर्माण करणे.
४. समिती सदस्यांनी आरोपी व वाहने पकडून वन / पोलीस विभागास हस्तांतरीत करणे व वनगुन्हे रोखण्यासाठी वन विभागास मदत करणे.
५. समिती सदस्याच्या मार्गदर्शनाखाली पर्यटकांना राखीव वनात प्रवेश व मच्छिमारीचा आनंद घेणे.

## ५.०० गावनिहाय कांदळवन निहाय सूक्ष्म आराखडे तयार करणेः-

### ५.०१ आधारभूत माहिती संकलित करणे व सूक्ष्म आराखडे तयार करणेः -

कांदळवनांचे कोणत्याही तऱ्हेचे नुकसान होणार नाही व न्यायालयीन आदेशांचे सर्वत: पालन होईल अशा पध्दतीने अभ्यासपुर्वक सूक्ष्म आराखडा तयार करणे आवश्यक राहील. कांदळवनांच्या विकासाच्या सूक्ष्म कृती आराखडा अंतर्गत केलेल्या कामांचे मूल्यमापन करणे व फलनिष्पत्तीबाबत निष्कर्ष काढणे यासाठी सुरुवातीला “बेंच मार्कींग” करणे आवश्यक आहे. त्यामुळे सुरुवातीलाच संस्था पातळीवर उपलब्ध जन-जल-जंगल-जमीन या कांदळवनांशी संबंधित संसाधनांची सद्यस्थिती व सांख्यिकी माहिती (आधारभूत माहिती) संकलित करण्यात यावी व त्याच आधारे व्यक्तिसमूह विकासासाठी आवश्यक उपचार / उपाययोजनांचा सूक्ष्म आराखडयामध्ये समावेश करावा. यासाठी सहभागीय ग्रामीण समीक्षण (Participatory Rural Appraisal) पध्दतीचा वापर करु शकतात. त्यासाठी सामाजिक व साधन संपत्ती नकाशा, शिवार फेरी, हंगामाचे विश्लेषण, इतिहासकालीन घटनाक्रम, मॅट्रीक्स रँकींग, चपाती आकृती, स्थानिक तंत्रज्ञानची साधने इत्यादी पध्दतींचा वापर करता येईल. निवड केलेल्या गांवाचे सभोवताल ३ कि.मी परिघातील कांदळवन आच्छादनाची सन २००५ रोजीची स्थिती दाखविणारे सुरुवातीचे उपग्रह छायाचित्र प्राप्त करुन ठेवण्यात यावे, जेणेकरुन वेळोवेळी वनाच्छादनात होत असलेले बदल परिगणीत करता येतील.

सदर योजने अंतर्गत गावांचे सूक्ष्म कृती आराखडे समितीशी सल्लामसलत करुन, सदस्यांच्या सहभागाने, निवडलेल्या तज्ञांचा सल्ला व मार्गदर्शनाखाली अतिशय शास्त्रोक्त पध्दतीने तयार करणे व काळजीपूर्वक अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. सूक्ष्म आराखडा १० वर्षाचे कालावधीकरिता तयार करण्यात यावा. तथापि, सूक्ष्म आराखडयात सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीकरिता नियोजित करण्यात आलेली कामे या योजनांतर्गत करावी.

सदर आराखडा प्रति समिती प्रति वर्ष रु. १००.०० लाखाच्या कमाल मर्यादा पर्यंत ठेवण्यात यावा. यापेक्षा जास्त निधीची मागणी असेल तर त्याबाबत सविस्तर तपशील सादर करुन, राज्य स्तरीय समितीची पूर्व मंजूरी घेऊन राबवण्यात यावा. क्लस्टर (समूह) स्वरुपातील काही कामांसाठी जर प्रस्ताव असेल (उदा. हॅचरी, शीतगृह इ.) व त्याकरिता समूहातील समित्यांची एकात्मिक मागणी असेल तर ज्यादा तरतूद करण्याचे अधिकार राज्यस्तरीय समितीलाही राहतील. याबाबत अंतिम अधिकार अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांचे राहतील. त्यांनी योजना अंतर्गत वार्षिक तरतूद विचारात घेऊन याबाबत आवश्यक ती मंजूरी द्यावी.

गावाचा सूक्ष्म कृती आराखडा संबंधित क्षेत्रास लागू असलेल्या कार्यआयोजना / व्यवस्थापन आराखडा यांच्याशी सुसंगत राहील. त्यामध्ये भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, वन (संवर्धन) अधिनियम, १९८०, पर्यावरण (संरक्षण), अधिनियम, १९८६, अनुसूचित जाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व त्यातील नियमावली, न्यायालयीन आदेश इत्यादीचा उल्लघंन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

समझौता समयलेख झाल्यानंतर पुढील २ महिन्यात सूक्ष्म आराखडा तयार करुन मंजूरी प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित कांदळवन सह व्यवस्थापन समितीची राहील. सुक्ष्म आराखडा मंजूर करण्याचे अधिकार संबंधित उप वनसंरक्षक / विभागीय वन आधिकारी यांना राहील.

५.०२ <u>वार्षिक कृती आराखडा तयार करणे</u> :

सूक्ष्म आराखडा तयार केल्यानंतर वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात यावा व त्यात वर्षनिहाय प्रस्तावित कामे व लागणारे अनुदान इत्यादी समाविष्ट करावे, जेणे करुन प्रकल्प स्वरुपात (Project Mode) कामांची अंमलबजावणी व संनियंत्रण करणे शक्य होईल.

६.०० <u>तज्ञांची नियुक्ती :</u>

सदर योजने अंतर्गत गावांचे सूक्ष्म कृती आराखडे शास्त्रोक्त पध्दतीने तयार करणे अपेक्षित आहे. याकरिता कांदळवने व सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठानकडील कृषी तज्ञ, वानिकी तज्ञ, निसर्ग तज्ञ, उपजिविका विषयावरील तज्ञ यांची सेवा कंत्राटी पध्दतीने प्रतिष्ठानमार्फत नियुक्ती करण्यात येईल. तसेच नियुक्त करावयाचे तज्ञांचे मानधन त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार निश्चित करता येईल. तज्ञांच्या नियुक्तीवर होणारा खर्च प्रशासकीय खर्चातून भागविण्यात येईल.

७.०० <u>योजना समन्वयकाची निवड</u> :

**"कांदळवन सह व्यवस्थापन समिती"** च्या मार्फत सदर योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या बाबतीत वन, इतर विभाग व गाव समितीशी योग्य समन्वय साधने आवश्यक आहे. योजनेतील तांत्रिक सुसूत्रता व अंमलबजावणी यासाठी प्रति दोन गावांमागे एक समन्वयकाची कांदळवन प्रतिष्ठानमार्फत कंत्राटीपध्दतीने नियुक्ती योजना कालावधीत करता येईल. सदर समन्वयक मत्स्य व्यवसाय पदवीधारक असावा. यामध्ये स्थानिक व्यक्तीला गुणवत्तेच्या आधारे प्राधान्य देण्यात येईल.

८.०० <u>योजने अंतर्गत करावयाची कामे</u> :-

८.०१ <u>कांदळवन संधारण</u> : वन विभागाच्या ताब्यात असलेल्या कांदळवन क्षेत्रावर नैसर्गिक / कृत्रीम पुन:उत्पादनाची कामे घेणे, पाण्याचे चॅनेल्स अबाधित व नव्याने तयार करणे, वन विभागांतर्गत मंजूर नमूना आराखडयाचा वापर करुन या योजनेअंतर्गत मंजूर निधी खर्च करण्यात येईल.

८.०२ <u>पर्यायी रोजगारांची संधी वाढविणे</u> :

अ) गावातील महिला व युवकांना स्वयंरोजगारविषयी प्रशिक्षण देणे, क्षमता बांधणी करणे व रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे, याकरिता औदयोगिक तज्ञांचा व पर्यटन संस्थाचा सहभाग घेणे, गौण वनउपज संकलन, मूल्यवृध्दी व विक्रीस सहाय्य करणे.

ब) निसर्ग पर्यटन व गृह पर्यटनाचा (Home stay) विकास करणे तसेच अनुषांगिक क्षमता बांधणी करणे, प्रशिक्षण देणे.

क) समझोता समय लेखातील समाविष्ट बाबी.

८.०३ <u>स्वच्छता अभियान राबविणे</u> :

निसर्ग पर्यटन / गृह पर्यटनास चालना देण्यासाठी त्या वस्तीत / गावात स्वच्छता राखणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरीता शौचालयाचे बांधकाम करणे, मैला प्रक्रिया व व्यवस्थापन (Sewage Management), सांडपाणी शुध्दीकरण / प्रक्रिया (Treatment of Waste Water), घन कचरा व्यवस्थापन (Solid Waste Management), स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे, इत्यादी कार्यक्रम शासनाचे संबंधित योजनेअंतर्गत घेण्यात यावे.

८.०४ **कृषी संसाधनांचा विकास** :-

कांदळवन सह व्यवस्थापन समितीतील सदस्यांची कृषी उत्पादकता वाढविणे, उत्पादन खर्च कमी करण्याकरिता गांडूळ खत / सेंद्रीय खत / जैविक कीटकनाशक ग्राम स्तरावर तयार करणे व वापरण्यास प्रोत्साहन देणे, रासायनिक शेतीचे "सेंद्रिय शेतीत" रुपांतर करणे, SRI/SRT भात उत्पादन, कृषी उत्पादन प्रक्रिया / मूल्यवर्धन (Agro Processing / Value Addition) सुरु करणे, बांबू लागवड, फलोत्पादन विकास, खाजगी पडीक शेतात तसेच शेतातील बांधे, वनशेतीसारखे कार्यक्रम इत्यादी राबविणेकरीता शासनाच्या विविध योजनामार्फत आवश्यक ती कामे करण्यात येतील.

८.०५ **कांदळवनाची लागवड** :-

सन २०१७-१८ ते २०१९-२० या ३ वर्षात किमान १० लाख कांदळ वृक्षाची लागवड करण्यात येईल. तसेच कांदळवनांच्या संरक्षणाबाबत भरीव उपाययोजना ग्रामस्थांचे / समित्यांचे माध्यमातून करण्यात येईल.

९.०० **निधी वितरण**

शासनाकडून निधी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांना वितरीत होईल, तेथून तो मागणीप्रमाणे संबंधित उप वनसंरक्षकांना / विभागीय वन अधिकारी यांना तसेच कांदळवन प्रतिष्ठानला वितरीत होईल, संबंधित उप वनसंरक्षकांना / विभागीय वन अधिकारी यांनी मागणी करतांना सुक्ष्म आराखडयास मंजूरी प्राप्त झाल्याची खात्री करावी तसेच मंजूर कामाचे प्राधान्यक्रम ठरवून, वर्षनिहाय आराखडा तयार करुन अपेक्षित कामांसाठीच्या रक्कमेची मागणी करावी.

एकूणच उपलब्ध होणारा निधी हा वन विभागामार्फत किंवा समिती मार्फत किंवा कांदळवन प्रतिष्ठान मार्फत अशा त्रिविध पध्दतीने परंतु अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांचे एकात्मिक नियंत्रणाखाली विनियोगात आणण्यात येईल.

९.०१ योजनेचा खर्च ज्या लेखाशिर्षा खाली भागविण्यात येईल, त्याबाबतचा शासन निर्णय वेगळयाने निर्गमित करण्यात येईल.

१०.०० **प्रशासकीय खर्च**

सदर योजने अंतर्गत मंजूर अनुदानाच्या ५% रक्कम प्रशासकीय खर्चासाठी देय राहील. यामध्ये तज्ञ व्यक्तींचे व गाव योजना समन्वयकाचे मानधन, मत्स्य व्यवसाय पदवी धारकांचे मानधन तसेच माहिती भरण्या करिता प्रकल्प स्तरावरील Data Entry Operators चे मानधन, सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे व इतर प्रशासकिय खर्च यांचा समावेश राहील.

११.०० **मूल्यमापन** :

प्रकल्पस्तरीय समितीने या योजनेतंर्गत केलेल्या कामाचे वेळोवेळी अंर्तगत मूल्यमापन करुन घेण्यात यावे व आवश्यकतेनुसार त्रयस्थ यंत्रणेमार्फत विशिष्ट कामांचे मूल्यमापन करुन घेण्यात येईल.

१२.०० **सामाजिक अंकेक्षण** :

सामाजिक अंकेक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उदा. मस्टर रोल, कॅशबुक, बिल, मोजमाप पुस्तके, तांत्रिक मंजूरी, प्रशासकीय मंजूरी, कामाची तपासणी, कामाची गुणवत्ता, कागदपत्रांची तपासणी करणे, सामाजिक अंकेक्षण संपल्यानंतर अहवाल वाचून दाखविणे इत्यादी सामाजिक अंकेक्षणाची

जबाबदारी संबंधित कांदळवन सह व्यवस्थापन समितीची राहील. सामाजिक अंकेक्षणाची पूर्व सूचना कमीत कमी १५ दिवस अगोदर देणे आवश्यक आहे.

**१३.०० माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली :**

सदर योजनेकरिता कांदळवन कक्षाच्या संकेत स्थळावर एक स्वतंत्र जागा (Page) देण्यात येईल, ज्यामध्ये खालील माहितीचा समावेश असेल : -

१) सदर योजने अंतर्गत प्रकल्प निहाय निवडलेल्या गावांची यादी, गाव निहाय मंजूर सुक्ष्म आराखडा व गाव निहाय / वर्षवार करावयाच्या कामाची यादी.

२) उपलब्ध अनुदान, झालेला खर्च, कामाची सदयस्थिती, कामाचे छायाचित्र, वार्षिक लेखापरिक्षण अहवाल, ग्राम परिस्थितीकी विकास समितीचे मासिक सभेचे कार्यवृत्तांत व प्रकल्प स्तरीय समितीचे / राज्यस्तरीय समिती सभेचे कार्यवृत्तांत.

**१४.०० कांदळवन सह व्यवस्थापन समितीची / सदस्यांची मान्यता रद्द करणे :**

कांदळवन सह व्यवस्थापन समितीने त्यांचे कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचे पालन करताना हयगय केल्यास तसेच वन अधिनियमांचे भंग केल्यास विभागीय वन अधिकारी / उप वनसंरक्षक ही समिति बरखास्त करु शकतील.

सदस्याचा सदस्यता रद्द करण्याचा निर्णय कांदळवन सह व्यवस्थापन समिती घेईल, हे करताना नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे पालन करण्यात येईल.

**१५.०० अपील करणे :**

समिती बरखास्त होणे किंवा सदस्याची सदस्यता भंग झाल्यानंतर एक महिन्याच्या आत संबधित समिती किंवा सदर सदस्य, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील अपील करु शकतील. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांचा निर्णय अंतिम राहील व सर्व संबंधितांवर बंधनकारक असेल.

**१६.०० जिल्हास्तरीय समिती :**

कांदळवन संनियंत्रणासाठी व अंमलबजावणी करण्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येईल :

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | संबंधित विभागीय वन अधिकारी / संबंधित उप वनसंरक्षक | सदस्य सचिव |
| ३) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) | जिल्हा कृषी अधिक्षक | सदस्य |
| ५) | सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय अधिकारी | सदस्य |
| ६) | जिल्हा प्रतिनिधी, अग्रणी बँक | सदस्य |
| ७) | पर्यावरण विभाग प्रतिनिधी | सदस्य |
| ८) | दोन विकास समितीचे अध्यक्ष | सदस्य |
| ९) | प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ | सदस्य |

**जिल्हास्तरीय समितीच्या कार्याचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील -**

१. सूक्ष्म आराखडयास व त्यातील कामांना मंजूरी देणे.

२. योजनेचा अहवाल तयार करणे.

३. विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना प्राधान्याने निवडलेल्या गावांमध्ये राबविणे व त्याकरिता विविध विभागाचे समन्वय करणे.

४. सूक्ष्म आराखडयाप्रमाणे काम राबविण्यावर नियंत्रण ठेवणे व कामाचे मूल्यमापन करणे.

जिल्हास्तरीय समितीची बैठक वर्षातून किमान दोनदा आयोजित करणे अनिवार्य राहील.

**१७.०० <u>राज्यस्तरीय समिती</u> :**

कांदळवन संरक्षण योजना कार्यक्रमाची अंमलबजावणीचा आढावा संनियंत्रण करणे, उदभवणारी प्रश्ने सोडविणे यासाठी "राज्यस्तरीय समिती" पुढीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| १) | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर | अध्यक्ष |
| २) | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई | सदस्य |
| ३) | आयुक्त, कोंकण विभाग | सदस्य |
| ४) | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे | सदस्य |
| ५) | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर | सदस्य |
| ६) | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ | सदस्य |
| ७) | मत्स्यव्यवसाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ८) | दोन विकास समितीचे अध्यक्ष | सदस्य |
| ९) | उप वनसंरक्षक (कांदळवन), मुंबई | सदस्य सचिव |

**<u>राज्यस्तरीय समितीच्या कार्याचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील</u> : -**

१. योजनेच्या प्रभावी कार्यन्वयनासाठी जिल्हास्तरीय समितीला सविस्तर मार्गदर्शन करणे, मागदर्शक सूचना जारी करणे.

२. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडीअडचणी दूर करणे.

३. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनास धोरणात्मक शिफारशी करणे.

ि

राज्यस्तरीय समितीची बैठक वर्षातून किमान एकदा आयोजित करणे अनिवार्य राहील.

वरील शासन निर्णय वित्त, नियोजन, पर्यावरण विभाग, कृषी व पदुम विभाग यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२०१७३५५९३८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.09.20 17:26:53 +05'30'

**( वीरेन्द्र तिवारी )**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**<u>प्रत :-</u>**

१. मा.मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव.

२. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
४. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (पर्यावरण), मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण.
१३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई.
१५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
१६. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे / कोल्हापूर.
१७. आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८. जिल्हाधिकारी, ठाणे /रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदूर्ग.
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (ठाणे /रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदूर्ग).
२०. सर्व संबंधित उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी
२१. सर्व संबंधित उप विभागीय अधिकारी.
२२. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ.
२३ जिल्हा कृषी अधिक्षक (ठाणे /रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदूर्ग).
२४. जिल्हा प्रतिनिधी, अग्रणी बँक (ठाणे /रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदूर्ग).
२५. निवड नस्ती, महसूल व वन विभाग, फ-३.

## समझौता समयलेखाचे प्रारुप

“**कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना**” (खाजगी व्यक्ती / संस्था) यामध्ये सुक्ष्म नियोजन आराखडयाच्या अंमलबजावणीकरिता समझौता समयलेख.

सदर समझौता समयलेख श्री. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी, . . . . . . . . वन विभाग (यांना यानंतर पक्ष क्रमांक १ असे संबोधण्यात येईल) व श्री. / श्रीमती . .. . . . . . . . . . . . . . . . रा. . . . . . . . . . . . तालुका .. . . . . . जिल्हा . . . . . हा . . . . .. . . . अध्यक्ष, कांदळवन सह व्यवस्थापन समिती, गांव . . . . . . . . . . “कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना” राबविण्यासाठी करण्यात येत आहे.

१. “कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना” राबविण्यास तयार असल्याबाबतचा ठराव दिनांक . . . . . . . . . चे सभेत पारीत करण्यात आलेला आहे.

२. “कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना” अंतर्गत मिळणारे फायदे घेण्याकरिता कांदळवनांमध्ये विना परवाना प्रवेश, डेब्रिस अथवा अन्य घनकचरा टाकण्यास मनाई, कुऱ्हाड बंदी, वनवणवा नियंत्रण व संरक्षण कामात सहाकार्य करणे इत्यादी बाबींमध्ये गावाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पाडण्यास व्यक्ती / संस्था यांची संमती आहे.

३. “कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना” राबविण्यासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या जबाबदाऱ्या पार पाडतील व त्या अनुषंगाने विहित केलेले फायदे मिळण्यास समिती पात्र राहतील.

४. समितीस अनुज्ञेय फायदे व योजनेच्या मार्गदर्शक तत्वे / शासनाने वेळोवेळी निर्गर्मित केलेल्या मापदंडानुसार राहील.

५. सूक्ष्म आराखडयामधील कामे शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दती व वित्तिय नियमावलीच्या अधीन राहून करण्यात येतील.

६. सदर करारनामा कार्यान्वयन करतांना दोन्ही पक्षात वाद निर्माण झाल्यास संबंधित अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांचा निर्णय अंतिम राहील व तो दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील.

**स्वाक्षरी**

“कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना”
खाजगी व्यक्तीचे नाव

**स्वाक्षरी**

**(उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी)**

**साक्षीदार**

१) नाव . . . . . . . . . . . स्वाक्षरी . . . . . .
२) नाव . . . . . . . . . . . स्वाक्षरी . . . . . .

**साक्षीदार**

१) नाव . . . . . . . . . . स्वाक्षरी . . .. . . .
२) नाव . . . . . . . . . . स्वाक्षरी . . .. . . .